दै. पुण्यनगरी दि. 19.06.2025


**उमरी पोलिसांची कारवाई** ● तीन आरोपी ताब्यात ● नेट ग्रीन ॲपद्वारे मयताची ओळख पटली; मृत युवक निघाला हैदराबादचा

# धानोरा खून प्रकरणाचा महिनाभरानंतर झाला उलगडा

**उमरी (जि. नांदेड) :** धानोरा बुद्रुक (ता.उमरी) येथील एका शेतकऱ्याच्या आखाड्यावर थांबलेल्या २४ वर्षीय अनोळखी तरुणाला चोर समजून १० ते १५ जणांनी दोरीने बांधून केलेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाला. ही घटना गेल्या महिन्यात १० मेरोजी रात्री १ च्या सुमारास घडली. या खुनाचा उलगडा करण्यात उमरी पोलिसांना महिन्याभराने यश आले आहे. या तपासात पोलिसांनी मराठवाड्यात प्रथमच नेट ग्रीन ॲपचा वापर करुन आरोपींचा शोध घेतला असून ३ जणांना अटक केली तर आणखी ५.६ जणांना पकडण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## मराठवाड्यात प्रथमच तंत्रज्ञानाचा यशस्वी वापर

या प्रकरणाचा तपास माने करीत असून धानोऱ्यातील खून प्रकरणाचा पूर्ण उलगडा होण्याच्या मार्गावर आहे. १ महिन्यानंतर मयताची ओळख नेट ग्रीन ॲपचा वापर करुन उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी माने व सहकाऱ्यांचे कौतुक केले आहे. उमरी तालुक्यातील गोरठा शिवारात एकाला जाळून मारण्यात आले होते. या प्रकरणातही अंकुश माने व त्यांच्या चमूने मयताच्या हातातील अंगठीवरुन शोध घेत प्रेम प्रकरणातून त्याच्या मारेकऱ्यांचा शोध घेतला होता.



## माने यांचे आवाहन

उमरी तालुक्यातील ग्रामीण भागात कोणी अनोळखी व्यक्ती गावात आलाच तर तात्काळ उमरी पोलीसात कळवावे. त्याला मारहाण करू नका. असे आवाहन पोलिस निरीक्षक अंकुश माने यांनी पुण्यनगरीशी बोलताना केले. या तपास कामी जमादार अरविंद हैबतकर, सिद्धार्थ केळकर यांनीही मदत केली.

धानोरा बु. गावात ९ मे रोजी अनोळखी २४ वर्षाचा युवक सायंकाळच्या सुमारास गावात आला होता. उन्हाळा दिवस असल्याने त्याला तहान लागली. पाणी पिऊन रस्त्यावर आलेल्या काहींनी हा तरुण चोर असेल असे समजून त्याची चौकशी केली असता त्याला मराठी, हिंदी भाषा समजत नव्हती. त्यामुळे तो चोर असावा असे समजून हाकलून दिले. धानोरा शिवारातील दासरे या शेतकऱ्यांच्या आखाड्यावर गेला असता तेथेही चोर समजून त्याला १०.१५ लोकांनी दोरीने बांधून मारहाण केल्याने त्याचा मृत्यू झाला. ही घटना १० मे रोजी सकाळी उघडकीस आली. पोलिस पाटील राहुल पांचाळ यांनी पोलिसांना माहिती दिली. तात्काळ पोलीस घटनास्थळी पोहोचले.त्या तरुणाला उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. पोलिसांनी शवविच्छेदन करून उमरी पोलीसात आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला.मृताची ओळख पटवण्याचे आव्हान उमरी पोलिसांसमोर होते. पोलीस अधिकारी अंकुश माने यांनी मयताच्या छातीवर, हातावर गोंदलेले,हातातले कडे या आधारे शोधाचा प्रयत्न केला परंतु तो अवघड होते. माने यांनी या घटनेची माहिती वरिष्ठांना देत पोलिस अधीक्षक व उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या परवानगीने सदर मयताची ओळख पटविण्यासाठी त्यांनी प्रथमच नेट ग्रीन ॲपचा वापर केला. त्या आधारे हा मयत शेख फरदीन शेख जमील (२४ रा.बहादरपुरा हैदराबाद) येथील असल्याची ओळख पटली. पोलिसांनी त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेत घटनेची माहिती दिली.

मयत हा हैदराबादवरुन छत्रपती संभाजीनगर येथे कामाला जायचा. कधी हैदराबाद येथेच ऑटो चालवायचा असे नातेवाईकांनी पोलिसांना सांगितले.आई आणि मयताची डीएनए चाचणी केल्यावर त्याची ओळख पटली असे मयताचा भाऊ तक्रारदार शेख अफरिद शेख जमील याने सांगितले. त्यानंतर त्याने दिलेल्या फिर्यादीवरुन उमरी पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले आहे. यात दोन अल्पवयीन असल्याने त्यांची रवानगी बाल सुधार गृहात केली आहे तर एका आरोपीला जेलमध्ये पाठविले आहे.यात अजून ५.६ आरोपी असून त्यांनाही अटक करण्यात येणार असल्याचे पोलिस अधिकारी माने यांनी सांगितले.